392

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३/ २०९७/२०२४
दिनांक १० /०९ /२०२४.

"जाहीर नोटीस"
(झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

प्रस्तावना-

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **"उपरोक्त अधिनियम"** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे. आणि,

२) ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे; आणि,

३) ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियोजन आहे; आणि,

४) ज्याअर्थी, खालील अनुसूची १ मध्ये नमूद केलेली मिळकत बांधकाम आयोग्य असलेने सदर मिळकतीवरील झोपडीधारकांचे १०० टक्के पुनर्स्थानिश्चयन व पुनर्वसन अनुसूची २ मध्ये नमूद महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडून वाटप करण्यात आलेल्या MIDC प्लॉट नं. P -२५ & P-२६, पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, पुणे या भूखंडावर करणेचे प्रस्तावित करणेत आलेले आहे; आणि,

५) ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ने त्यांच्या संचालक मंडळाच्या ठराव क्र.६६९१, दि.१३/१२/२०२३ व ६७८१, दि.०६/०३/२०२४ नुसार सदर भूखंडावर निवासी प्रयोजन अनुज्ञेय केले असून त्यावर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबवण्यास संमती दिली आहे व भूखंडाचा भाडेपट्टा विकसकाच्या लाभात दि.०५/०४/२०२४ रोजी हस्तांतरीत केला आहे; आणि,

६) ज्याअर्थी, खालील अनुसूची १ मध्ये नमूद केलेली ही मिळकत महानगरपालिकेकडून झोपडपट्टी म्हणून घोषीत केलेली नाही हे विचारात घेता सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी यांनी त्यांचेकडील पत्र क्र. झोनिपु/०४/कावि/८४/२०२३, दि.१७/०४/२०२३ अन्वये सदर ठिकाणी सादर केलेला झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल व सक्षम प्राधिकारी क्र.३ झोपुप्रा, पुणे यांनी देखील दि.१०/०८/२०२३ रोजी स्थळपाहणी करून दाखल केलेला स्वतंत्र अहवाल पाहता सदर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याजोगी परिस्थिती आहे; आणि,

७) ज्याअर्थी, खालील अनुसूची १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे ७/१२ उता-यानुसार एकूण ५६६०.०० चौ.मी. असून, त्रिमितीय पद्धतीने केलेल्या परिगणनेनुसार ३६२८.५९ चौ.मी. इतके आहे. त्यामुळे सदर योजनेकरीता वरीलपैकी कमीत कमी ३६२८.५९ चौ.मी इतके क्षेत्र विचारात घेण्यात येत आहे. तसेच स्थलांतरणाने पुनर्वसन प्रस्तावित असलेल्या MIDC प्लॉट नं.P -२५ & P-२६, पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, पुणे येथे स्थलांतरण प्रस्तावित आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या आदेश क्र. MIDC/RO(PUNE)/Pimpri/७६७, दि.२६/०२/२०२४ च्या भूखंड वाटप आदेशानुसार सदर भूखंडाचे क्षेत्र १२६७६.०० चौ.मी. इतके आहे. परंतु MIDC यांचेकडील दि.१६/०३/२०२४ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार सदर भूखंडाचे १३०३०.०० चौ.मी. इतके क्षेत्र विचारात घेण्यात येत आहे; आणि,

८) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा

नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिक संस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटीस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील " असे नमूद केले आहे; आणि,

९) ज्याअर्थी, अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारित अधिनियम २०१७) चे कलम ३(क) नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार सदर क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यासंदर्भातील आदेश पारित करण्यात येत आहेत.

आदेश :-

(१) अनुसूची१ मध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने व अनुसूची २ मधील क्षेत्रात स्थलांतरणाने पुनर्वसन प्रस्तावित असल्याने सदर दोन्ही क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत पूर्वसूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

(२) अनुसूची१ व २ मध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात सक्षम प्राधिकारी क्र.३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत सदर क्षेत्र उक्त कलमाखाली “झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र” म्हणून घोषित करण्यासंदर्भात आवश्यक तो निर्णय गुणवत्तेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

(३) अनुसूची १ मधील क्षेत्रासंदर्भात महानगरपालिकेमार्फत प्रकल्प राबवतेवेळी जारी केलेली दि.०२/११/२००७ रोजीची अधिसूचना त्या क्षेत्रापुरती रद्द करण्यात येत आहे. मात्र संबंधित अनुसूची १ मधील क्षेत्र एकसलगपणे झोपडीमुक्त करुन कोणत्याही प्रकारे दुबार लाभ न देता पुनर्वसीत करणे अनिवार्य राहील.

(४) सदर प्रकरणी प्रस्ताव दाखल करतेवेळी दि.०७/०८/२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशातील सर्व शर्ती-अटींची पूर्तता कलम ३ (क) अंतर्गत आदेश अंतिम करणेपूर्वी अनिवार्य असेल.

## अनुसूची क्र.१

## सध्या अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीचे क्षेत्र

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.५६पै, सि.स.नं.१०१५ पै, सेक्टर क्र.२२, मिलिंदनगर पैकी इंदिरानगर, निगडी, पिंपरी चिंचवड, जिल्हा-पुणे (Non Buildable)

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (अंदाजे) | चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| मिलिंदनगर पैकी इंदिरानगर | स.नं.५६पै, सि.स.नं १०१५ पै, सेक्टर क्र.२२ | पिंपरी चिंचवड नववसाहत प्राधिकरण | ३६२८.५९ चौ.मी. | स.नं.५६पै, सि.स.नं. १०१५ पै | स.नं.५६पै, सि.स.नं. १०१५ पै , ला .स.नं.५७, सि.स.नं. १०१५ | स.नं.५६पै, सि.स.नं. १०१५पै, व लागू रस्ता | स.नं.५६पै, सि.स.नं. १०१५पै, लागू तळवडेची शीव |

390

अनुसूची क्र.२

ज्या ठिकाणी स्थलांतरणाने पुनर्वसन करावयाचे ते क्षेत्र

झोपडपट्टीचे नाव :- MIDC प्लॉट नं. P -२५ & P-२६, पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, जिल्हा- पुणे.

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, पुणे | MIDC प्लॉट नं. P -२५ & P-२६ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (भाडेपट्टाधारक - मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स) | १३०३०.०० चौ.मी. | २४.५० मीटर रस्ता | १८.० मी रस्ता व ६.०० मी रस्ता | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ची सरहद्द | प्लॉट नं. RL.२१० RL.२११ RL २०९ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

दिनांक :- १० / ९ /२०२४.

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

१०.९.२४

प्रत-

१. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
२. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे-१९ -यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
४. विकसक मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स - यांना पुढील कार्यवाहीस्तव.